संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

---

# मिळालेली रोजगाराची संधी टिकवणे आवश्यक - कुलगुरू

## विद्यापीठात विभागीय रोजगार मेळावा संपन्न

## चार हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग

अमरावती.

रोजगार मेळाव्यांमधून दरवर्षी हजारो विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम विद्यापीठाच्या माध्यमातून केले जाते. परंतु, रोजगाराची संधी प्राप्त झाल्यावर ती टिकवून ठेवणे अत्यंक आवश्यक आहे. चांगल्या भविष्यासाठी आजच्या युवा पिढीने याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने विभागीय रोजगार भरती मेळाव्याचे आयोजन विद्यार्थी भवनात करण्यात आले, त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता उपसंचालक श्री एस.आर. काळबांडे, सहाय्यक संचालक सौ. प्रांजली बारस्कर, डॉ. गजानन गुल्हाने, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, एल.एल.ई.चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, विद्यापीठामधून दरवर्षी शिक्षण घेवून विद्यार्थी बाहेर पडतात, परंतु रोजगारासाठी आवश्यक ते कौशल्य विद्यार्थ्यांनी प्राप्त करणे आवश्यक आहे. यासाठी विद्यापीठाकडून देखील सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पुढे म्हणाले, महाराष्ट्र शासनाने या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगार देण्यासाठी आमंत्रित केले आहे, पण नोकरीसाठी उमेदवारांनी आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे.

डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, रोजगार मिळण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच समयसुचकता आणि चाणाक्ष बुद्धीमत्ता सुद्धा आवश्यक आहे. या रोजगार मेळाव्यात सर्वांसाठी निवडीची समान संधी असून प्रत्येकालाच रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अध्यक्षीय भाषणात उपसंचालक श्री एस.आर. काळबांडे म्हणाले, रोजगार मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कौशल्य दाखवून द्यावीत. कौशल्य विकास विभागाकडून दरवर्षी रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाते. लवकरच विद्यापीठांतर्गत पाचही जिल्ह्यात अशाच पद्धतीचे रोजगार मेळावे स्थानिक विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येतील.

विद्यापीठ गीत, संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन करुन मेळाव्याला सुरुवात करुन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नामांकित कंपन्यांचे उद्योजक व त्यांचे प्रतिनिधी यांचा संत गाडगे बाबांची प्रतिमा देवून कुलगुरुंनी सत्कार केला. प्रास्ताविक विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक संचालक सौ. प्रांजली बारस्कर यांनी केले. संचालन प्रा. चेतन राऊत यांनी, तर आभार डॉ. श्रीकांत पाटील यांनी मानले. डॉ. अंबिका जयस्वाल व डॉ. मावळे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयोच्या विद्यार्थ्यांनी महामेळावा व्यवस्थेसाठी परिश्रम घेतलेत. या महामेळाव्याला चार हजारांचे वर पाचही जिल्ह्यातील उमेदवारांनी नोंदणी केली.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २२/०२/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी